Phone No. 91- 07232-242456
Phone No. 91- 07232-243504

Fax No. 91-07232-244148
E-mail – est12vngmcyavatmal@gmail.com
Web-site - www.vngmcytl.org.

# श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ.
## SHRI. VASANTRAO NAIK GOVT. MEDICAL COLLEGE, YAVATMAL

जा.क्र.श्रीवनाशावैमय/आस्था१-२/थेट मुलाखत/रिक्तपदभरणे/7262-66/२१ दि.22/०४/२०२१

## — जाहिरात —

विषय :- सहाय्यक प्राध्यापक/वैद्यकीय अधिकारी/वरिष्ठ निवासी/आवासी संवर्गातील रिक्त पदे थेट मुलाखतीव्दारे १२० दिवसांकरीता भरण्याबाबत..

संदर्भ :- १) शासन पत्र क्र.एलईसी-१४२१/प्र.क्र.७३/वैसेवा-४ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई दि.१२.०४.२०२१
२) शासन पत्र क्र.एलईसी-१४२१/प्र.क्र.७३/वैसेवा-४ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई दि.१६.०४.२०२१
३)क्र. संवैशिवसं/कोविड-१९/ता.व्य/बाहयस्त्रोत/अ-४/१२०४/२०२१ दि.१२.०४.२०२१
४) क्र. संवैशिवसं/कोविड-१९/ता.व्य/बाहयस्त्रोत/अ-४/७२५१/२०२१ दि.१६.०४.२०२१

संदर्भीय विषयास अनुसरुन श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील खालील नमुद विषयातील सहाय्यक प्राध्यापक/वैद्यकीय अधिकारी/वरिष्ठ निवासी/आवासी या संवर्गातील पदे संदर्भ क्र.०१ ते ०४ चे पत्रान्वये मध्यवर्ती समितीच्या शिफारशीनुसार पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवाराची नियुक्ती होईपर्यंत किंवा ईतर संस्थेतन बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा तदर्थ पदोन्नतीने कार्यरत असलेले अध्यापक पदावनत होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत स्थानिक निवड मंडळामार्फत १२० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात प्रचलीत शासन नियमानुसार व शासन निर्णय क्रमांक -वेतनी-२०१९/प्र.क्र. ०३/२०१९/वैसेवा-२ दि.३१.१२.२०२० नुसार सहाय्यक प्राध्यापक या पदाकरीता एकत्रीत ठोक मानधन रु. १,१०,०००/- (अक्षरी एक लाख दहा हजार फक्त) या मानधनावर व वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता शासन निर्णय क्र.एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३ दि.३१.१२.२०२० एकत्रीत ठोक मानधन रु.८०,०००/- (अंशी हजार फक्त) या मानधनावर व वरिष्ठ निवासी व आवासी या पदाकरीता शासन नियमानुसार विद्यावेतनावर व गुणवत्तेनुसार दि. २८/०४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता थेट मुलाखतीव्दारे भरण्यात येणार आहे. याकरीता दि. २२/०४/२०२१ रोजी या संस्थेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. पात्र उमेदवारांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रासह थेट मुलाखतील स्वखर्चाने उपस्थित राहावे तसेच जे उमेदवार अन्य शासकीय अथवा निमशासकीय/खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत त्यांनी संबंधित संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकित प्रती जोडाव्यात.

या संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक/वैद्यकीय अधिकारी/वरिष्ठ निवासी/आवासी सवंर्गातील १२० दिवसांकरीता भरावयाच्या पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | विषय | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| | | महाविद्यालय | |
| १ | सहाय्यक प्राध्यापक | शरीरक्रियाशास्त्र | ०१ |
| २ | | न्यायवैद्यकशास्त्र | ०३ (खुला-१*, ईमाव-१, अ.जा.-१) |
| ३ | | औषधवैद्यकशास्त्र | ०१ |
| ४ | | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ |
| ५ | | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ०१* |
| ६ | | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ |
| ७ | मा.बा.सं.अधि. नि -अधिव्याख्याता | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ०१* |
| ८ | सांख्यिकी नि- अधिव्याख्याता | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र | ०१ |
| ९ | वरिष्ठ निवासी | शल्यचिकित्साशास्त्र | ०५ |
| १० | | स्त्रिरोग व प्रसुतीशास्त्र | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | | क्षयरोग व छातीविकारशास्त्र | ०१ |
| १२ | | क्ष-किरणशास्त्र | ०२ |
| १३ | | बधिरिकरणशास्त्र | ०४ |
| १४ | | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ |
| | | **रुग्णालय** | |
| १ | सहाय्यक प्राध्यापक | बालरोगचिकित्साशास्त्र | ०१ |
| २ | वैद्यकीय अधिकारी | — | ०५ (खुला-२ + १*, अ.ज.-१, वि. जा.भ.ज.-अ/ब/क/ड-१, ) |
| ३ | आवासी | | ०२ |

टिप :- * चिन्हांकित केलेली पदे उपलब्ध असल्यास महिला उमेदवारांसाठी राखीव असेल.

**अ) शैक्षणिक अर्हता :-**

**सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी -**

१) सहाय्यक प्राध्यापक पदासाठी संबंधित विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी (एमडी/एमएस/डीएनबी).

२) भारतीय आयुर्विज्ञान परिषद नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या शैक्षणीक अर्हता.

३) सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांच्या निकषानुसार वरीष्ठ निवासी या पदाचा किमान एक वर्षाचा अनुभव असणे गरजेचे आहे.

४) एम.एम.सी./एम.सी. आय.रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याचे नोंदिचे प्रमाणपत्र)

**वरिष्ठ निवासी या पदासाठी -**

१) उमेदवाराने भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार संबंधित विषयात मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी (एमडी/एमएस/डीएनबी/ईतर) पास केलेली असावी वा संबंधित विषयात ३ वर्ष वा अधिक कार्य केल्याचा अनुभव असावा व तसे अनुभव प्रमाणपत्र आवश्यक असेल.

३) एम.एम.सी, /एम.सी. आय. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याचे नोंदिचे प्रमाणपत्र)

**वैद्यकीय अधिकारी या पदासाठी -**

१) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान एमबीबीएस अर्हता.

२) एम.एम.सी/एम. सी. आय रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.

**ब) सहाय्यक प्राध्यापक या पदासाठीचे प्राध्यान्यक्रम खालील प्रमाणे राहतील.**

१) श्री. वसंतराव नाईक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हता धारक.

२) महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले पद्व्युत्तर पदवी अर्हता धारक (महानगर पालीकेच्या महाविद्यालयासह)

३) ईतर अभिमत विद्यापीठातून उत्तीर्ण झालेले पदव्युत्तर पदवी अर्हताधारक.

**क) वयोमर्यादा :- खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४५ वर्ष व सेवानिवृत्त उमेदवारांसाठी सामान्य प्रशासन यांचे शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील तरतुदिनुसार लागू.**

**ड) अर्जाबरोबर सादर करावयाची कागदपत्रे -**

१) अर्ज योग्य त-हेने खोडतोड न करता परिपुर्ण भरुन पुढील कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतिसह सादर करणे आवश्यक आहे.

२) प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. उत्तीर्ण गुणपत्रीका व पदवी प्रमाणपत्र.

३) पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र, प्रयत्नांचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र/ माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र,

४) एम.एम.सी, रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याचे नोंदिचे प्रमाणपत्र)

**इ) जाहिरातीमधील मजकूरात बदल करण्याबाबत :-**

या जाहिरातीमधील कोणत्याही मजकूरात उदा.अटि/नियम/शर्ती/पदसंख्या इ. मध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम निर्णय/अधिकारही अधिष्ठाता यांना असतील.

टिप :- १) जाहिरातीतील नमुद पदे ही मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने सद्यस्थितीत उद्भवलेली कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता प्रथमतः १२० दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात किंवा **कोविड -१९** चा प्रादुर्भाव आटोक्यात येईपर्यंत भरण्यात येत असून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड झाल्याल्या उमेदवारांचा पुनर्नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. **सदर नियुक्ती ही केवळ कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भावाची उपाययोजनेचा भाग म्हणून करण्यात येत आहे.**

२) ज्या उमेदवारांना संचालनालयाकडून मध्यवर्ती निवड प्रक्रियेद्वारे यापुर्वी सहाय्यक प्राध्यापक, विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता शिफारस/निवड करण्यात आली आहे असे उमेदवार या मुलाखतीस पात्र राहणार नाही.

३) निवड प्राप्त उमेदवारांना कोविड -१९ आपत्कालीन परिस्थितीनुसार कोविड-१९ ड्युटी करणे बंधंनकारक राहील.

वरील नमुद केलेल्या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे. मुलाखत ही दि. २८/०४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे घेण्यात येईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी, तसेच ज्या उमेदवारांनी या जाहिरीतीपुर्वी अर्ज सादर केलेले असतील, त्यांनी सदर जाहिरातीनुसार पुनश्चः अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. रिक्त पदांची संख्या कमी अथवा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वेळेवर आरक्षीत उमेदवार उपलब्ध न-झाल्यास आरक्षणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या www.vngmcytl.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द आहे.

अधिष्ठाता,
श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ

प्रति :-
१)उपरोक्त संबंधित विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, श्री.व.ना.शा. वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ.
२) वैद्यकीय अधिक्षक, श्री.व.ना.शा. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ.
३) सुचना फलक, अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी वसतीगृह, बाह्यरुग्ण विभाग, ग्रंथालय, श्री.व.ना.शा. वै. महाविद्यालय,यवतमाळ.
४) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये/मुंबई,पुणे,सोलापूर,कोल्हापुर,अंबाजोगाई,लातूर,नांदेड,अकोला, नागपूर,धुळे,मिरज,औरंगाबाद,चंद्रपूर,गोंदिया, जळगांव,बारामती

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर.
१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, गो.ते.रुग्णालय, संकुल, ९ वा मजला, मुंबई-०१
२)मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई